महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४

webside www.sscboardkolhapur.in & www.mahahsscboard.gov.in
PBX - 0231-2696101, 102, 103 FAX : [0231] 2690758 E-Mail: divsec.kop@ gmail.com

क्र. कोविमं/ शाखा परिक्षा/ 2788
कोल्हापूर
दि. ०९/ ०२/२०१९
१७/०१/

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा फेब्रु./मार्च २०१९ परिक्षेस प्रविष्ठ होणा-या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी.स्काउट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती बाबत....

संदर्भ - १) जा.क्र.रा.मं/परिक्षा.७/२२ दि.१/२ /१/२०१९
२) शासन निर्णय क्रमांक उमाशि.२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ दि. २०/१२/२०१८

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन उच्च माध्यामिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्र/मार्च २०१९ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतची सुधारित नियमावली प्राप्त झाली असून सोबतच्या परिशिष्ठ क्र.१ ते ११ नुसार खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

सोबत परिशिष्ठ क्र.१ ते ११

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

**शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२**
**दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट**

## *परिशिष्ट- १*

## खेळाडू विद्यार्थ्यांना क्रिडा सवलतीचे वाढीव गुण देण्याकरिता सुधारित नियमावली

(१) सन २०१८-१९ पासून इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या खेळाडू विदयार्थ्यांना देण्यात येणा-या क्रीडा गुणांची सवलत ही फक्त परिशिष्ट - २ मध्ये नमूद केलेल्या क्रीडा स्पर्धा, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड ची शिबीरे यामध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या अथवा प्राविण्य संपादन करणाऱ्या खेळाडू/छात्र तसेच स्काऊट गाईड विद्यार्थ्यांसाठीच देय राहील.

(२) १४ /१६ वर्षाखालील गटात म्हणजे इ. ६ वी पासून इ. १० वी पर्यंत केव्हाही जिल्हा/ विभाग/ राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांस माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत (इ.१० वी )मध्ये परिशिष्ट ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सवलतीचे गुण देण्यात येतील. क्रीडा प्रमाणपत्रावर विद्यार्थी कितव्या इयत्तेत असताना खेळला त्या इयत्तेचा उल्लेख असावा.

(३) तथापि इयत्ता १० वी पूर्वी विद्यार्थ्याने प्राविण्य मिळविलेले असले तरी, सवलतीचे गुण मिळण्याकरिता त्या विद्यार्थ्याने इ. १० वी मध्ये क्रिडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक राहील.

(४) १८ वर्षाखालील गटात म्हणजे इ. ६ वी पासून इ. १२ वी पर्यंत केव्हाही जिल्हा/ विभाग/ राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांस उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत (इ.१२ वी )मध्ये परिशिष्ट ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सवलतीचे गुण देण्यात येतील. क्रीडा प्रमाणपत्रावर विद्यार्थी कितव्या इयत्तेत असताना खेळला त्या इयत्तेचा उल्लेख असावा.

(५) तथापि इयत्ता १२ वी पूर्वी विद्यार्थ्याने प्राविण्य मिळविलेले असेल तरी त्या विद्यार्थ्याने इ. १२ वी मध्ये क्रिडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक राहील. (या खेळाडू विद्यार्थ्याने इ. ६ वी ते इ. १० वी या कालावधीत प्राविण्य मिळविलेले असेल व याकरिता असलेले सवलतीचे गुणांचा लाभ एकदा घेतला असेल तर त्याला पुन्हा इ. १२ वी करीता याचा लाभ घेता येणार नाही तथापि या खेळाडू विद्यार्थ्याने इ. ११ वी व इ. १२ वी मध्ये प्राविण्य / सहभाग घेतला असेल तर त्याला परिशिष्ट ६ प्रमाणे गुण अनुज्ञेय आहेत.)

(६) खेळाडू कोणत्याही जिल्हयातून खेळला तरी, खेळाडू विद्यार्थी ज्या ठिकाणी शिकत असेल त्या जिल्हयाच्या क्रीडा अधिकारी यांनी त्यास प्रमाणित करावे.

(७) इ.१० वी व इ. १२ वी च्या एन.सी.सी.चा छात्र तसेच स्काऊट गाईड विद्यार्थ्यांसाठी, विविध स्तरावरील शिबीरे तसेच संचलनांचा कालावधी हा त्या त्या शैक्षणिक वर्षातील इ.१० वी आणि इ.१२ वी च्या परीक्षेपूर्वीचा कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.

(८) इ.१० वी व इ. १२ वी मध्ये शिकत असलेला खेळाडू विद्यार्थी हा एकांपेक्षा अधिक खेळात /क्रीडा स्पर्धेत, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड ची शिबीरे यात सहभागी झालेला असेल तर त्याला उच्चतम असणाऱ्या एकाच सहभाग / प्राविण्याचे सवलतीचे गुण अनुज्ञेय राहतील.

(९) संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी खेळाडूचे परिपूर्ण प्रस्ताव विहित नमुन्यात त्या शैक्षणिक वर्षात **दि.१ जानेवारी ते दि.५ एप्रिल पर्यंत** जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. जे खेळाडू इ. १० वी व इ. १२ वी या इयत्तापूर्वी खेळलेले असतील त्यांचे प्रस्ताव जानेवारी मध्येच जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करावेत.

(१०) संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन त्या शैक्षणिक वर्षातील प्रस्ताव **दि. ३० एप्रिल पर्यंत** संबंधित विभागीय मंडळ कार्यालयास शिफारशीसह सादर करावेत.

(११) या शासन निर्णयातील परिशिष्ट-११ मधील खेळ प्रकारांनाच गुणदान देण्यात येणार आहे.

(१२) संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी, संबंधित शाळा/महाविदयालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडून प्राप्त झालेले विहीत नमुन्यातील क्रीडा गुणांसाठीचे अर्ज, परिशिष्ट ४ आणि ५ मध्ये नमुद केलेल्या अभिलेख्यानुसार छाननी करुन त्या शैक्षणिक वर्षातील **दि.३० एप्रिल पर्यंत** संबंधित विभागीय शिक्षण मंडळ यांच्या कार्यालयास शिफारसीसह सादर करावेत.

(१३) एखादया खेळाडू विद्यार्थ्याने क्लबकडून राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत केलेले प्रतिनिधीत्व अथवा संपादन केलेले प्राविण्य क्रीडा गुण सवलतीसाठी अनुज्ञेय असणार नाही.

(१४) एकविध खेळाच्या जिल्हा/राज्य संघटनांनी जिल्हा व राज्यस्तर क्रीडा स्पर्धांची प्रमाणपत्रे वाटप करताना, प्रमाणपत्र वितरण रजिस्टरमध्ये प्रमाणपत्रांची नोंद करणे आवश्यक आहे. एकविध खेळाच्या जिल्हा/राज्य संघटनांनी स्पर्धेच्या प्रत्येक प्रमाणपत्रावर अनुक्रमांक, संघटनेचा नोंदणी क्रमांक व दिनांक, जिल्हा/राज्यस्तरीय कितवी स्पर्धा आहे, स्पर्धेचा कालावधी, स्पर्धा स्थळ, स्पर्धेच्या प्रकारनिहाय वजनगट /वयोगट तसेच खेळाडूंच्या जन्मतारखेचा उल्लेख करणे बंधनकारक आहे.

(१५) एकविध खेळ संघटनेच्या जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांच्या प्रमाणपत्रांवर संबंधित जिल्हा, राज्य व राष्ट्रीय संघटनेच्या अध्यक्ष अथवा सचिव यांची शाईची स्वाक्षरी अनिवार्य आहे.

(१६) एकविध खेळाच्या जिल्हा/राज्य क्रीडा संघटनांनी त्यांच्या जिल्हा/राज्य/राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजनाचे वेळापत्रक **स्पर्धा आयोजन कालावधीपूर्वी किमान ८ दिवस वेबसाईटवर प्रसिद्ध करावे** व त्याची प्रत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना पाठवावे. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी अथवा त्यांच्या प्रतिनिधीने स्पर्धेच्या कालावधीत, स्पर्धा ठिकाणी भेटी देऊन स्पर्धेसंबंधीचा संक्षिप्त अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

(१७) इंडियन आलिंपिक असोसिएशनशी संलग्न नसलेल्या परंतु केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागाने मान्यता दिलेल्या राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असलेल्या राज्य क्रीडा संघटनेस महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशने संलग्नता दिलेली नाही व दुस-या राज्य क्रीडा संघटनेस संलग्नता दिली आहे, असे झाल्यास अशा प्रकरणांमध्ये केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागाने मान्यता दिलेल्या राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असलेली राज्य क्रीडा संघटना ही अधिकृत समजण्यात येईल.

(१८) एकविध खेळांच्या राज्य क्रीडा संघटनांनी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे अभिलेखे कायमस्वरुपी जतन करुन ठेवावेत व क्रीडा संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

(१९) विविध स्तरावरील क्रीडा स्पर्धांत प्राविण्य संपादन करणा-या तथा प्रतिनिधीत्व करणा-या खेळाडू विदयार्थ्यांना अनुज्ञेय असलेल्या वाढीव क्रीडागुण सवलतीचा तपशिल परिशिष्ट -६ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.त्यानुसार वाढीव क्रीडा गुणांची सवलत अनुज्ञेय राहील.

(२०) महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा संचलित क्रीडा प्रबोधिनीच्या ज्या

संघाना संबंधित एकविध खेळाच्या राज्य संघटनेने, जिल्हयाचा दर्जा दिलेला आहे अशा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या, क्रीडा प्रबोधिनीच्या खेळाडू विदयार्थ्यांना राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील सहभाग/प्राविण्याचे गुण अनुज्ञेय राहतील.

(२१) संबंधित समादेशक अधिकारी/गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना व जिल्हा संघटन आयुक्त, स्काऊट व गाईड यांनी त्या शैक्षणिक वर्षातील परिशिष्ट -२ मधील नमूद शिबीरे/संचलन यामध्ये सहभागी होऊन यशस्वीपणे पूर्ण केलेल्या तसेच राष्ट्रपती पदक विजेत्या विदयार्थ्यांची यादी त्या शैक्षणिक वर्षाच्या **दि. १ मार्च पर्यंत** स्वाक्षरीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करावी.

(२२) संबधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी, संबंधित शाळा/महाविदयालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडून प्राप्त झालेले विहीत नमुन्यातील एन.सी.सी. व स्काऊट गाईड गुणांसाठीचे अर्ज, समादेशक अधिकारी/गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना व जिल्हा संघटन आयुक्त, स्काऊट गाईड यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिलेख्यानुसार छाननी करुन त्या शैक्षणिक वर्षातील **दि.३० एप्रिल पर्यंत** संबंधित विभागीय शिक्षण मंडळ यांच्या कार्यालयास शिफारसीसह सादर करावेत.

(२३) महाराष्ट्र शासनाच्या अपंग कल्याण विभागाच्या अपंग कल्याण आयुक्तालयाने क्रीडा गुणांची सवलत अनुज्ञेय असलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी व सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळांना त्या शैक्षणिक वर्षाच्या **दि. १ एप्रिल पर्यंत** पाठवाव्यात.

(२४) एकविध खेळाच्या जिल्हा क्रीडा संघटनेने, राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारा जिल्हयाचा संघ हा जिल्हास्तरीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करुन त्यामधून निवडलेला असावा.

(२५) जिल्हास्तरावरील, विभागस्तरावरील, राज्यस्तरावरील स्पर्धांमध्ये केवळ प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांनाच गुणांची सवलत उपलब्ध राहील. मात्र आतंरराष्ट्रीय व राष्ट्रीयस्तरावर, प्राविण्य प्राप्त करणाऱ्या तसेच सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा गुणांच्या सवलती देय राहतील.

(२६) याव्यतिरिक्त इ. ११ वी प्रवेशाकरिता खेळाडूंकरिता निश्चित करण्यात आलेला कोटा केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होणारे खेळाडू विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधील पदक विजेते खेळाडू विद्यार्थी यांच्याकरिताच उपलब्ध राहील अन्य खेळाडू विद्यार्थ्यांना परिशिष्ट ६ मध्ये विहित केल्याप्रमाणे फक्त गुणांची सवलत अनुज्ञेय राहिल.

(२७) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या एन.सी.सी.चे छात्र तसेच स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना परिशिष्ट क्र.७ मध्ये विहीत केल्याप्रमाणे वाढीव गुण सवलतीचा लाभ अनुज्ञेय राहील.

(२८) ज्या क्रिडा संघटनांमध्ये अधिकृतता व संलग्नता संदर्भात वाद आहेत अशा संघटनांमार्फत खेळणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना सद्यास्थितीत क्रिडा गुणांची सवलत दिली जाईल. तथापि अधिकृतते संदर्भातील निर्णय झाल्यानंतर केवळ अधिकृत संघटनेमार्फत खेळणाऱ्या विद्यार्थ्यांनाच त्यापुढील काळात क्रिडा गुणांची सवलत अनुज्ञेय राहील.

(२९) उपरोक्त नमूद नियमावलीमध्ये बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२
दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट

## *परिशिष्ट- २*

## १) क्रीडागुण सवलतीसाठी पात्र असणाऱ्या क्रीडा स्पर्धा.

(१) भारतीय शालेय खेळ महासंघ पुरस्कृत व क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे द्वारा आयोजीत केलेल्या विविध खेळ प्रकारांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा, भारतीय शालेय खेळ महासंघाने विविध राज्याकडे आयोजन सोपविलेल्या शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, तसेच आंतरराष्ट्रीय शालेय खेळ महासंघाद्वारा आयोजित आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा, स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशनमार्फत आयोजित स्पर्धा.

(२) केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभाग पुरस्कृत व क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे द्वारा आयोजित केलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा, तसेच केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागाद्वारा विविध राज्याकडे आयोजन सोपविलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.

(३) सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी, जवाहरलाल नेहरु हॉकी टूर्नामेंट सोसायटी पुरस्कृत व क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे द्वारा आयोजीत केलेल्या सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल व जवाहरलाल नेहरु हॉकी कप या खेळांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा. तसेच सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी, जवाहरलाल नेहरु हॉकी टूर्नामेंट सोसायटी द्वारा आयोजित केलेल्या सदर खेळांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.

(४) केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागाद्वारा मान्यता देण्यात आलेल्या एकविध राष्ट्रीय क्रीडा संघटनांमार्फत आयोजित राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा व अशा राष्ट्रीय संघटनांशी संलग्न असणा-या एकविध खेळांच्या राज्य संघटनाद्वारा द्वारा आयोजित राज्य अजिंक्यपद स्पर्धा.

(५) इंडियन ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असणा-या राष्ट्रीय संघटनाद्वारा आयोजित राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा व त्यांच्याशी संलग्न असणा-या एकविध खेळांच्या राज्य संघटनाद्वारा आयोजित विभाग, राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा.

(६) इंडियन ऑलिंपिक असोसिएशनशी सलग्न असणारी एकविध खेळाची राष्ट्रीय संघटना किंवा केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागाद्वारा मान्यता देण्यात आलेली एकविध खेळाची राष्ट्रीय क्रीडा संघटना ज्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेस संलग्न आहे त्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेने आयोजित केलेल्या अधिकृत आंतराराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.

(७) महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असणा-या एकविध खेळाच्या राज्य संघटनाद्वारा आयोजित राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा.

(८) महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा.

(९) महाराष्ट्र शासनाच्या अपंग कल्याण विभागामार्फत आयोजित दिव्यांगांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा.

(१०) इंडियन ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असणा-या एकविध खेळाची राष्ट्रीय संघटना किंवा केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागाद्वारा मान्यता देण्यात आलेल्या एकविध खेळाच्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेने एखादया प्रांतास राज्य संघटनेचा दर्जा दिला असल्यास अशा राज्य संघटनेद्वारा आयोजीत राज्य अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा.

(११) "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा.

(१२) क्रीडा गुणांची सवलत ही परिशिष्ट ११ मध्ये नमुद केलेल्या क्रीडा प्रकारांना अनुज्ञेय राहील.

**(२) एन.सी.सी.गुण सवलतीसाठी पात्र संचलन/शिबीरे.**

(१) प्रजासत्ताक दिन संचलनपुर्व राष्ट्रीयस्तर शिबीरे/ स्पर्धा.

(२) आंतरराष्ट्रीय युथ एक्सचेंज प्रोग्रॅम मधील सहभाग.

**(३) स्काऊट व गाईड गुण सवलतीसाठी पात्र शिबीरे.**

(१) राष्ट्रपतीपदक विजेते स्काउट व गाईड विदयार्थी

(२) आंतरराष्ट्रीय जांबोरी शिबीर.

***************

**शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२**
**दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट**

## परिशिष्ट -३

( एकविध खेळाच्या राज्य संघटनेची अधिकृतता ठरविण्यासाठी एकविध खेळांच्या राज्य क्रीडा संघटनांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी.)

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | एकविध खेळाच्या राज्य संघटनेचे, धर्मादाय आयुक्त यांचेकडे संस्था नोंदणी अधिनियम १८६० किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेले प्रमाणपत्र. अथवा केंद्र शासनाच्या कार्पोरेट अफेअर्स विभागाकडे कंपनी ॲक्ट अन्वये नोंदणी केलेले प्रमाणपत्र . |
| २ | एकविध खेळाच्या राज्य क्रीडा संघटनेच्या घटना व नियमावलीची प्रत.<br>एकविध खेळाच्या राज्य क्रीडा संघटनेची धर्मादाय आयुक्त यांनी प्रमाणीत केलेली कार्यकारी मंडळाची प्रमाणीत प्रत. (राज्य संघटनेच्या कार्यकारणी मंडळामध्ये कोणत्याही कारणाने बदल झाल्यास संबधित धर्मादाय आयुक्त यांचेकडे सादर केलेल्या कार्यकारणीचा चेंज रिपोर्टची प्रत व सदर कार्यकारणीस इंडीयन ऑलिंपिक असोसिएशनशी सलग्न अथवा केंद्रशासनाची मान्यता असलेल्या राष्ट्रीय संघटनेची सलग्नता असल्याचे राष्ट्रीय संघटनेचे अद्ययावत पत्र जोडावे.) |
| ३ | राज्य क्रीडा संघटनेस महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची संलग्नता असल्याबाबतचे, राज्य क्रीडा संघटनेच्या अध्यक्ष व सचिवांच्या नावाचा उल्लेख असलेले महाराष्ट्र ऑलिपिंक असोसिएशनचे पत्र. |
| ४ | एकविध खेळाच्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेशी संबधित एकविध खेळाची राज्य क्रीडा संघटना संलग्न असल्याचे राज्य क्रीडा संघटनेच्या अध्यक्ष व सचिवांच्या नावाचा उल्लेख असलेले संबंधित राष्ट्रीय क्रीडा संघटनेचे अद्ययावत पत्र. |
| ५ | एकविध खेळाच्या राज्य क्रीडा संघटनेस संलग्नता दिलेल्या, एकविध खेळाच्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेस केंद्र शासनाने मान्यता दिलेली असल्यास त्याबाबतचे केंद्र शासनाचे पत्र. |
| ६ | एकविध खेळाच्या राज्य क्रीडा संघटनेस संलग्नता दिलेल्या, एकविध खेळाच्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेस इंडियन ऑलिंपिक असोसिएशनने संलग्नता दिलेली असल्यास त्याबाबतचे इंडियन ऑलिंपिक असोसिएशनचे पत्र. |
| ७ | एकविध खेळाच्या राज्य क्रीडा संघटनेस संलग्न असलेल्या जिल्हा क्रीडा संघटनांची अध्यक्ष व सचिवांच्या नावाचा उल्लेख असलेली यादी. |

*****

**शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२**
**दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट**

## परिशिष्ट -४

(एकविध खेळाच्या जिल्हा क्रीडा संघटनेने संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांना सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी.)

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| (१) | जिल्हा क्रीडा संघटनेचे धर्मदाय आयुक्त यांचेकडे संस्था नोंदणी अधिनियम १८६० किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी प्रमाणपत्र . |
| (२) | जिल्हा क्रीडा संघटना राज्य क्रीडा संघटनेस संलग्न असल्याबाबतचे पत्र. |
| (३) | जिल्हास्तर क्रीडा स्पर्धेचा संपूर्ण अहवाल.(सहभागी संघ, खेळाडू यादी,भाग्यपत्रिका (Copy of draws) व अंतिम निकाल ) |

************

**शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२**
**दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट**

## परिशिष्ट -५

(एकविध खेळाच्या राज्य क्रीडा संघटनेने क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांना सादर करावयाच्या स्पर्धाविषयक कागदपत्रांची यादी.)

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| (१) | ज्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा क्रीडागुण सवलतीसाठी लाभ घ्यावयाचा आहे, त्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजनाबाबतचे परिपत्रक. |
| (२) | ज्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा क्रीडागुण सवलतीसाठी लाभ घ्यावयाचा आहे, त्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांची भाग्यपत्रिका (Copy of draw). |
| (३) | ज्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा क्रीडागुण सवलतीसाठी लाभ घ्यावयाचा आहे, त्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे अंतिम निकालपत्र. |
| (४) | ज्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा क्रीडागुण सवलतीसाठी लाभ घ्यावयाचा आहे, त्या स्तरावरील क्रीडा स्पर्धात सहभागी झालेल्या खेळाडूंच्या नावांच्या विहित नमुन्यात ( परिशिष्ट १० ) दोन प्रतीतील याद्या ( प्राविण्यासहित ), त्यावर राज्य संघटनेचे अध्यक्ष / सचिव यांची शाईची स्वाक्षरी व शिक्का आवश्यक.एकविध खेळाच्या राज्य संघटनांनी जिल्हा क्रीडा अधिकारी मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे यांना खेळाडूंच्या नावाच्या यादया सादर करताना त्या मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे या तीनही जिल्ह्याच्या एकत्रितपणे सादर करणे आवश्यक आहे. |
| (५) | एकविध खेळाच्या राज्य संघटनेचे अध्यक्ष व सचिव यांच्या शाईच्या नमुना स्वाक्षरीचे पत्र. |

*********

शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२

दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट -६

[माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव क्रीडागुण सवलतीचा अनुज्ञेय तक्ता.]

| स्पर्धेचा स्तर | क्रीडा स्पर्धांचे प्रकार व आयोजक . | क्रीडा सवलतीचे अनुज्ञेय गुण | |
|---|---|---|---|
| | | प्राविण्य (प्रथम ते तृतीय क्रमांक पर्यंत) | इतर सर्व सहभागी खेळाडू |
| जिल्हास्तर | क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा आयोजीत विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा, नेहरु हॉकी कप, सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धा, "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा, स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | ०३ | ० |
| विभागस्तर | क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा आयोजीत विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा, नेहरु हॉकी कप, सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धा, "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा आणि स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा. | ०५ | ० |
| राज्यस्तर | क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा आयोजीत राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा, नेहरु हॉकी कप, सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा, "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा, स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | ०७ | ० |
| | २. महाराष्ट्र शासनाच्या अपंग कल्याण विभागाद्वारा आयोजीत राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा. | ०७ | ० |
| | ३. महाराष्ट्र शासनाच्या अदिवासी विकास विभागाद्वारा आयोजीत राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा. | | |
| | ४. एकविध खेळांच्या राज्य संघटनेद्वारा आयोजीत राज्य अजिंक्यपद स्पर्धा. | | |
| राष्ट्रीयस्तर | १. भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारा आयोजीत राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा.<br>२. केंद्र शासनाचा क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा. | १० | ०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३. सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी व जवाहरलाल नेहरु हॉकी टूर्नामेंट सोसायटी द्वारा आयोजित सदर खेळांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br><br>४. अधिकृत एकविध खेळांच्या राष्ट्रीय फेडरेशनद्वारा आयोजीत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा.<br>५."पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा.<br>६. स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | | |
| आंतरराष्ट्रीय | १. आलिंपिक, एशियन गेम्स व कॉमनवेल्थ गेम्स. | २५ | २० |
| | २. अधिकृत एकविध खेळांच्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनद्वारा आयोजीत केलेल्या आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा. | २० | १५ |
| | ३. आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजीत आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा | १५ | १० |

टिप :- वरील नमूद एकविध खेळ संघटनाद्वारा आयोजित क्रीडा स्पर्धा या अधिकृत वार्षिक अजिंक्यपद स्पर्धा असणे आवश्यक आहे. अन्य अथवा निमंत्रित स्पर्धांना क्रीडागुण सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

******************

शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/ एस.डी.२
दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट -७

[माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या एन.सी.सी.चे छात्र तसेच स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांना वाढीव गुण सवलतीचा अनुज्ञेय तक्ता.]

| विभाग | शिबीरे/संचलनाचा प्रकार | सवलतीचे अनुज्ञेय गुण |
|---|---|---|
| एन.सी.सी | १. प्रजासत्ताक दिन संचलन राष्ट्रीयस्तर शिबीर/संलग्न स्पर्धा सहभाग | १० गुण |
| | २. प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय शिबीर /संलग्न स्पर्धा पदक विजेते | १५ गुण |
| | ३. आंतरराष्ट्रीय युथ एक्सचेंज प्रोग्रॅम सहभाग. | २०.गुण |
| स्काऊट व गाईड | १. राष्ट्रपती पदक अथवा आंतरराष्ट्रीय जांबोरी शिबीर सहभाग. | १० गुण |

***********************

**शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२**

**दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट**

## परिशिष्ट -८

प्रजासत्ताक दिन संचलन- राष्ट्रीय स्तर शिबीरात सहभाग घेतलेल्या /त्यामधील संलग्न स्पर्धांमध्ये पदकविजेते झालेल्या तसेच आंतरराष्ट्रीय युथ एक्सचेंज प्रोग्रॅम मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत सवलत गुण मिळण्यासाठी विद्यार्थ्यांची यादी.सन २०.. - २०..

जिल्हा :-

**शिबीराचे नांव :-**

**शिबीर कालावधी :-**

**शिबीर ठिकाण :-**

| अ. क्र. | विदयार्थ्यांचे पूर्ण नांव | इयत्ता | जन्मदिनांक | शाळेचे नांव | प्राविण्य/ सहभाग | प्रमाणपत्र क्रमांक. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |

**(स्वाक्षरी व शिक्का)**

समादेशक अधिकारी/गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना.

**********

**शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२**

**दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट**

## परिशिष्ट -९

आंतरराष्ट्रीय स्तर जांबोरी शिबीर तसेच राष्ट्रपती पदक प्राप्त केलेल्या स्काउट व गाईड विद्यार्थ्यांना माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत सवलत गुण मिळण्यासाठी विद्यार्थ्यांची यादी.सन २०.. - २०..

जिल्हा :-

**शिबीराचे नांव :-**

**शिबीर कालावधी :-**

**शिबीर ठिकाण :-**

| अ. क्र. | विदयार्थ्यांचे पुर्ण नांव | इयत्ता | जन्मदिनांक | शाळेचे नांव | प्राविण्य/ सहभाग | प्रमाणपत्र क्रमांक. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |

**(स्वाक्षरी व शिक्का)**

जिल्हा संघटन आयुक्त, स्काऊट व गाईड

शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२

दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट -१०

(१) जिल्हा/विभाग/राज्य स्तर क्रिडा स्पर्धेत प्राविण्यप्राप्त खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले व प्राविण्यप्राप्त खेळाडू विद्यार्थ्यांना माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत क्रीडा गुण सवलत मिळण्यासाठी खेळाडू विद्यार्थ्यांची यादी.सन २०.. - २०..

**( वैयक्तिक स्पर्धेसाठी विहीत नमुना )**

जिल्हा :-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्पर्धेचे नांव :-** | | | | | | **खेळाचे नाव :-** | |
| **स्पर्धेचा कालावधी :-** | | | | | | **वयोगट :-** | |
| **स्पर्धेचे ठिकाण :-** | | | | | | | |
| अ. क्र. | खेळबाब/ वजन गट | खेळाडूचे पूर्ण नांव | इयत्ता | जन्मदिनांक | शाळेचे नांव | प्राविण्य/ सहभाग | प्रमाणपत्र क्रमांक. |
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |
| ३. | | | | | | | |
| ४. | | | | | | | |

(२) जिल्हा/विभाग/राज्य स्तर क्रिडा स्पर्धेत प्राविण्यप्राप्त खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले व प्राविण्यप्राप्त खेळाडू विद्यार्थ्यांना माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत क्रीडा गुण सवलत मिळण्यासाठी खेळाडू विद्यार्थ्यांची यादी.सन २०.. - २०..

**( सांघिक स्पर्धेसाठी विहीत नमुना )**

जिल्हा :-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्पर्धेचे नांव :-** | | | | | | **खेळाचे नाव :-** | |
| **स्पर्धेचा कालावधी :-** | | | | | | **वयोगट :-** | |
| **स्पर्धेचे ठिकाण :-** | | | | | | | |
| अ. क्र. | खेळबाब/ वजन गट | खेळाडूचे पूर्ण नांव | इयत्ता | जन्मदिनांक | शाळेचे नांव | प्राविण्य/ सहभाग | प्रमाणपत्र क्रमांक. |
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |
| ३. | | | | | | | |
| ४. | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरील रकान्यात नमूद केलेल्या खेळाडूने /खेळाडूंनी संघटनेने आयोजित केलेल्या अधिकृत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भाग घेतलेला असून सदरील माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आमच्या राज्य क्रीडा संघटनेची राहील.

स्वाक्षरी / शिक्का :-

सचिव / अध्यक्ष :-

**********

शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२
दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट- ११

[माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव क्रीडा गुण सवलतीमध्ये अंतर्भाव असलेल्या खेळाप्रकारांचा तक्ता]

| अ.क्र. | खेळ प्रकार | अ.क्र. | खेळ प्रकार |
|---|---|---|---|
| | अ) ऑलिम्पिक/एशियन/कॉमनवेल्थ मध्ये समाविष्ट असणारे खेळ प्रकार | | |
| १. | आर्चरी | २ | ॲथलेटिक्स |
| ३ | बॅडमिंटन | ४ | वेटलिफ्टींग |
| ५ | बास्केटबॉल | ६ | बॉक्सींग |
| ७ | सायकलींग | ८ | तलवारबाजी |
| ९ | फुटबॉल | १० | जिम्नॅस्टिक |
| ११ | हॅन्डबॉल | १२ | हॉकी |
| १३ | ज्युदो | १४ | व्हॉलीबॉल |
| १५ | लॉन टेनिस | १६ | रायफल शुटींग |
| १७ | टेबल टेनिस | १८ | तायक्वांदो |
| १९ | जलतरण | २० | कुस्ती |
| २१ | कबड्डी | २२ | सॉफ्टबॉल |
| २३ | बेसबॉल | २४ | नेटबॉल |
| २५ | कराटे | २६ | स्क्वॅश |
| २७ | वुशू | २८ | नेहरु हॉकी |
| २९ | सुब्रतो फुटबॉल | ३० | रग्बी |
| ३१ | सेपेक टकारा | ३२ | मॉडर्न पेन्टेथलॉन |
| ३३ | सॉफ्ट टेनिस | *********** | |
| | ब) ऑलिम्पिक/एशियन/कॉमनवेल्थ मध्ये समाविष्ट नसणारे खेळ प्रकार | | |
| ३४ | मल्लखांब | ३५ | खो-खो |
| ३६ | बॉलबॅडमिंटन | ३७ | कॅरम |
| ३८ | बुध्दीबळ | ३९ | क्रिकेट |
| ४० | थ्रोबॉल | ४१ | रोल स्केटींग/हॉकी |
| ४२ | योगासन | ४३ | किक बॉक्सींग |
| ४४ | सिकई | ४५ | रोलबॉल |
| ४६ | डॉजबॉल | ४७ | शुटींगबॉल |
| ४८ | टेनीक्वाइट | ४९ | आट्या-पाट्या |

(**टिप** :- वरील नमुद खेळप्रकारांची यादी ही सन २०१८-१९ या वर्षाची असून यामध्ये अधिकच्या खेळांचा समावेश झाल्यास त्यांनाही क्रीडागुण सवलतीचा लाभ अनुज्ञेय राहील. तथापि काही खेळप्रकार कमी झाल्यास त्या खेळप्रकारांना सवलत अनुज्ञेय राहणार नाही.)

*****************